अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

MO.9860898564
maharashtraaarambh@gmail.com

संपादक - दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -५६ | सोमवार दि.१३ नोव्हेंबर २०२३ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -56 | MONDAY DT.13 NOVEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## कै . यशवंतराव चाटे शिक्षण संस्थेचे सचिव शिवाजी चाटे यांच्यावरील बोगस गुन्हा अखेर रद्द

केज ।प्रतिनिधी

केज शहरातील कै. यशवंतराव चाटे शिक्षण संस्थेचे सचिव श्री शिवाजी चाटे यांच्यावर भाव बांधकीच्या वादातून दि . १५ ऑक्टोबर २०२२ रोजी केज येथे पोलीस ठाण्यात सौ गयाबाई रामधन चाटे यांच्या फिर्यादी वरून गुन्हा नंबर ४६७/२०२२ मधील कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ नुसार खोटा गुन्हा दाखल करण्यात आला होता ते आज दिनांक १० नोव्हेंबर २०२३ रोजी मुंबई उच्च न्यायालय खांडपीठ औरंगाबाद यांनी रद्द केला आहेकेज शहरातील कै. यशवंतराव चाटे शिक्षण संस्थेचे सचिव श्री शिवाजी चाटे यांच्यावर त्यांच्याच घरातील सावत्र चुलते श्री रामधनयशवंतराव चाटे यांच्या पत्नी सौ गयाबाई रामधन चाटे यांच्या कौटुंबिक वादविवादातून केज पोलीस ठाण्यात दिनांक २५ ऑक्टोबर २०२२ रोजी खोटी फिर्यादी देवून संस्थेचे सचिव श्री शिवाजी चाटे यांच्यावर कलम ४२० , ४६५ , ४६७ , ४६८ , ४७१ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता मात्र मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे फिर्यादी आणि संस्थेचे सचिव यांच्या वकिलांनी मा न्यामुर्ती श्री आर . जी . अवचट व एस.ए देशमुख यांच्या समोर संस्थेचे सचिव यांचे वकील ॲड मल्हारी अदाटे व व्ही डी व्होन यांनी न्यामुर्ती यांच्या समोर युक्तिवाद करून कशा प्रकारे संस्थेचे सचिव यांना खोट्या गुन्ह्यात अडकवले होते हे सिद्ध करून देण्यात आले व दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकून मा न्यामुर्ती यांनी अखेर श्री शिवाजी चाटे यांच्यावर खोटा गुन्हा दाखल केलेला आज रद्द केला असून त्यामुळे संस्थेची बदनामी करणाऱ्याला एक प्रकारे चांगलीच चपराक बसली आहे व संस्थेचे सचिव शिवाजी चाटे हे निर्दोष असल्याचे मा न्यायालयाने सांगितले त्यामुळे एक प्रकारे ब्लॅकमेलिंग , खंडणी खोर , खोटे गुन्हे दाखल करणार्यांना कोर्टाने चांगलेच फटकारले आहे . केज शहरातील कै. यशवंतराव चाटे शिक्षण संस्था ही चांगले विध्यार्थी घडवण्याचे काम करीत असल्याचे सर्व स्थरातून बोलले जात आहे



# ऐन दिवाळीत पोलिसांची धरपकड

## बीड जाळपोळ प्रकरणात १८१ जणांची दिवाळी जेलमध्ये

### ऐन दिवाळीत पोलिसांची धरपकड

शांततेत चाललेल्या मराठा आरक्षणाच्या आंदोलनाला बीडमध्ये हिंसक वळण लागले होते. अचानक सुरु झालेल्या जाळपोळीत कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे याची गंभीर दखल पोलिसांनी घेतली आहे. पोलिसांनी घटनेचे व्हिडिओ आणि सीसीटीव्हीच्या माध्यमातून हल्लेखोरांची ओळख पटवली आहे. ज्यात आतापर्यंत ५०० पेक्षा अधिक लोकांची ओळल पटली आहे. विशेष म्हणजे पोलिसांनी आतापर्यंत १०० पेक्षा अधिक लोकांना अटक करून जेलमध्ये तर काहींना न्यायालयीन कोठडीत पाठवले आहे. तसेच अजूनही पोलिसांची धरपकड सुरूच आहे. ऐन दिवाळीत पोलिसांची धरपकड सुरु असल्याने अनेकांनी शहर सोडले आहे. मात्र, या सर्व आरोपींना शोधून इतर जिल्ह्यात जाऊन पोलीस त्यांना ताब्यात घेत आहे.

बीड ।प्रतिनिधी

काही दिवसांपूर्वी जिल्ह्यात मराठा आरक्षणाच्या आंदोलनालात घुसून काही अज्ञात लोकांनी राजकीय नेत्यांच्या घरी आणि कार्यालयात जाळपोळ केल्याची घटना समोर आली होती. त्यामुळे या प्रकरणात पोलिसांकडून गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले होते. तर, बीड पोलिसांनी आरोपींची ओळख पटवून आतापर्यंत १८१ जणांना बेड्या ठोकल्या आहे. यातील काही जण पोलिस कोठडीत, तर काही कारागृहात आहेत. त्यामुळे या आरोपींना दिवाळी जेलमध्ये साजरी करण्याची वेळ आली आहे. विशेष म्हणजे या घटनांमध्ये पोलिसांनी आणखी ४०० जणांची ओळख पटवली आहे.



### आमच्यासाठी फक्त गुन्हेगार आरोपीच...

दरम्यान, विशेष समाजातील तरुणांना जाणीवपूर्वक अटक करून जेलमध्ये टाकण्यात येत असल्याचा आरोप बीड पोलिसांवर करण्यात येत आहे. मात्र, यावर पोलिसांनी देखील आपली भूमिका स्पष्ट केली आहे. बीड जाळपोळ प्रकरणात हल्लेखोरांची ओळख पटवूनचं प्रत्येक आरोपी ताब्यात घेतला जात आहे. उपलब्ध असलेले व्हिडिओ आणि सीसीटीव्हीत कैद झालेल्या हल्लेखोरांची ओळख पटवली जात आहे. त्यानंतर अटकेची कारवाई होत आहे. त्यामुळे जाळपोळ करणारे कोणत्या समाजाचे आहे हे आमच्यासाठी महत्वाचे नसून, आमच्यासाठी आरोपी हा आरोपीच आहे हे महत्वाचे असल्याचं पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांचे आंतरवाली सराटीत उपोषण सुरु असतानाच, ३० व ३१ ऑक्टोबर रोजी बीडमधील आंदोलक आक्रमक झाले. पाहता पाहता शहरात जाळपोळ सुरु झाली. राष्ट्रवादी भवन, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे, भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, बीआरएसचे दिलीप गोरे यांची कार्यालये पेटवून देण्यात आली. माजलगाव येथील नगरपालिकेसह आमदार प्रकाश सोळुंके, आमदार संदीप क्षीरसागर यांचे राहत्या घरांना आग लावण्यात आली. या प्रकरणी पोलिसांकडून ३०७ सारखे गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी आरोपींची ओळख पटवत त्यांना अटक करण्याची मोहीम राबवली आहे. ज्यात आतापर्यंत १८१ जणांना बेड्या ठोकण्यात आले आहे.

## सरकार उद्योगपतींना कडेवर घेऊन शेतकऱ्यांना गाडू पाहतेय : कॉम्रेड अजय बुरांडे

बीड/प्रतिनिधी

बीड शहरात शेतकऱ्यांच्या प्रश्नावर टाळ मृदंगाच्या गजरात किसान सभेने आज (सोमवार) आंदोलन केले. ऐन दिवाळीत शेतकरी रस्त्यावर उतरल्याने प्रशासनाची धावपळ उडाली. दरम्यान मागण्या मान्य न झाल्यास जेलभरो आंदोलन करणार असल्याचा कॉम्रेड अजय बुरांडे यांनी प्रशासनास दिला आहे.

बीड जिल्ह्यात दुष्काळी परस्थिती असल्याने शेतकरी संकटात आहे. ही भीषण परिस्थिती असतानाही शासन दुष्काळ जाहीर करतानाही निकष लावत आहे. हे चुकीचे असून शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी तसेच तात्काळ मदतही द्यावी या मागणीसाठी दिवाळीत बीडमधील शेतकरी रस्त्यावर उतरले होते.

किसान सभेच्या नेतृत्वाखाली बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर टाळ मृदंगाच्या गजरात मोर्चा काढून शेतकऱ्यांना न्याय देण्याची मागणी करण्यात आली. सध्याचे सरकार उद्योगपतींना कडेवर घेऊन शेतकऱ्यांना गाडू पाहत असल्याचा आरोपही यावेळी आंदोलकांनी केला.या आंदोलनावेळी जोरदार घोषणाबाजी करत शासनाचा निषेध नोंदवला. तसेच यापुढे देखील मागण्या मान्य न झाल्यास जेलभरो



आंदोलन करण्याचा इशारा किसान सभेच्या वतीने कॉम्रेड अजय बुरांडे यांनी दिला आहे.

## परळी औष्णिक विद्युत केंद्राचा ५२ वा वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन-मुख्य अभियंता डॉ अनिल काठोळे

परळी /प्रतिनिधी

येथील औष्णिक विद्युत केंद्राचा ५२व्या वर्धापन दिनानिमित्त दि १५ नोव्हेंबर रोजी मुख्य कार्यक्रम पारितोषिक वितरण समारंभास अध्यक्षस्थानी महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ पी अनबलगन (भा.प्र.से.) तर प्रमुख अतिथी संचालक संजय मरुडकर,संचालक अभय हरणे, संचालक बाळासाहेब थिटे, विशेष निमंत्रित कार्यकारी संचालक राजेश पाटील, पंकज सपाटे, नितीन चांदुरकर, नितीन वाघ, पी एम नागदेवते या मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहेत.

परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या ५२ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून,खास कर्मचारी ,अधिकारी व कुटुंबीयांसाठी, त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विविध उपक्रम राबविले गेले.

या मध्ये क्रीडा प्रकारात क्रिकेट,कुस्ती,व्हॉलीबॉल, बास्केटबॉल,बॅडमिंटन,टेबल टेनिस, कॅरम,चेस,धावणे,लांब उडी, थाळी फेक,भाला फेक, महिलांसाठी विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते.आपल्या कलागुणाना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये



हॅप्पी स्ट्रीट वॉक मार्केट बिल्डिंग पासून मॅराथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले . त्यानंतर हॅप्पी कार्निव्हलचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये विविध ग्रामीण, पुरोगामी खेळांचे, खानपानाचे, मेहंदी, झुला, घोडेस्वारी, बैल बंडीचे, ईटी दांडू इत्यादींचे आयोजन करण्यात आले होते .

शक्तीकुंज वसाहतीमधील विद्यार्थी तसेच नागरिकांनी मेळाव्यात सामील होऊन आनंदोत्सवाच्या कार्यक्रमाचा आनंद घेतला.द टॅलेंट शोचे आयोजन

खुले रंगमंच, शक्तीकुंज वसाहत येथे करण्यात आले होते. सांस्कृतिक समिती आणि अश्वमेध नाट्य संघ आयोजित रॅम्प वॉक मध्ये अनेकांनी सहभाग नोंदवला. द टॅलेंट शो अंतर्गतगायन/वादन,नृत्य,अभिनय/वेशभूषा, स्पेशल टॅलेंट याचबरोबर चित्र काढणे आणि चित्र रंगवणे स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. अनेकांनी या स्पर्धेत आपले नैपुण्य सिद्ध केले. खुले रंगमंच येथे दि १२ रोजी सांस्कृतिक कार्यक्रमात (लहान मुलांचे डान्स) सादर करण्यात आले.तसेच आनंद मेळावा व आर्केस्ट्रा (गीत गायनाचा ) आधी कार्यक्रम दि २ ते ११ नोव्हेंबर दरम्यान कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मुख्य अभियंता डॉ अनिल काठोळे हे अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी अधिक्षक उपमुख्य अभियंता अमित बनकर, प्रभारी उपमुख्य अभियंता हिम्मतराव अवचार, अभियंता एस एन बुकतारे, राजीव रेड्डी, धनंजय कोकाटे, प्रसन्न कुमार गरुड,वरिष्ठ व्यवस्थापक वित्ते व लेखा अरविंद येळे, धनजय कोकाटे, कार्यकारी अभियंता सुरेश गर्जे, सौ काठोळे मॅडम, सौ मनीषा अवचार, के एच गित्ते मॅडम, सुनीता मोहिते,कार्यकारी अभियंता मदन पवार, प्रभारी कार्यकारी अभियंता हेमंत यादव,कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ सतीश मुंडे, व्यवस्थापक एम एन जाधव, व्यवस्थापक सुनील पवार, श्रीगणेश मुंडे ,कामगार नेते हरिराम गित्ते, सुरक्षितता अधिकारी एस बी उदार, तुकाराम पाटील, वैजनाथ चाटे, प्रदीप चव्हाण, उपकार्यकारी अभियंता शाहू येवते, चैतन्य जाधव, राजू गाजले, के एच गित्ते मॅडम ,महेश होनमाने आदींची उपस्थिती होती. उपस्थितांचे आभार सहाय्यक कल्याण अधिकारी शरद राठोड यांनी मानले.

## पाणी देण्यास विरोध पण ऊस हवा, मराठवाड्यातून १२ लाख टन ऊस मात्र नगर जिल्ह्यातील 'या' ११ कारखान्यात

**संजीवनी,सोनई ,भेंडा साखर, केदारेश्वर साखर, गंगामाई साखर, कोपरगाव साखर, गंगासागर साखर, संगमनेर साखर, नगर तालुका साखर, कुकडी साखर, वृद्धेश्वर साखर यांचा समावेश**

शेवगांव(प्रशांत बाफना)

**मराठवाड्याला पाणी देण्यास विरोध करणाऱ्या अहमदनगर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींचे तब्बल ११ साखर कारखाने पैठण आणि गंगापूर तालुक्यातील उत्पादित उसावर चालतात. सुमारे १२ लाख टन ऊस हे कारखाने नेतात.केवळ राजकीय फायद्यासाठी पाणी सोडण्यास विरोध करायचा आणि आर्थिक फायद्यासाठी मराठवाड्यातून ऊस न्यायचा; असा दुहेरी खेळ हे राजकारणी खेळत आहेत.जायकवाडी प्रकल्पातील पाण्यावर मराठवाड्यातील शेतकरी उसाचे उत्पादन करतात. अनेक वर्षांपासून येथील शेतकरी अहमदनगर जिल्ह्यातील साखर कारखान्यांना उसाचा पुरवठा करतात. मराठवाड्याला हक्काचे पाणी मिळू नये, यासाठी अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातील पुढाऱ्यांनी शासनावर दबावतंत्राचा वापर सुरू केला.**

एवढेच नव्हे तर उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयातही याचिका दाखल केल्या आहेत. समन्यायी पाणी वाटप तत्त्वानुसार आणि उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार जायकवाडी प्रकल्पात ६५ टक्क्यांपेक्षा जलसाठा असेल तर या धरणाच्या ऊर्ध्व भाग असलेल्या नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यांतील समूह धरणांतून पाणी सोडणे बंधनकारक आहे. या निर्णयानुसार गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालकांनी मराठवाड्यासाठी गोदापात्रात ८.६ टीएमसी पाणी सोडण्याचे आदेश दिले.आदेशाची अंमलबजावणी होऊ नये, यासाठी प्रयत्न करणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील ११ साखर कारखाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील उसावर चालत असल्याचे ते विसरल्याचे बोलले जात आहे. मराठवाड्याविरोधात आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या प्रमुख नेत्यांपैकी आ. शंकरराव गडाख यांचा सोनई साखर कारखाना आणि कोल्हे यांचा संजीवनी साखर कारखाना आहेत. भेंडा साखर, केदारेश्वर साखर, गंगामाई साखर, कोपरगाव साखर, गंगासागर साखर, संगमनेर साखर, नगर तालुका साखर, कुकडी साखर, वृद्धेश्वर साखर यांचा प्रामुख्याने समावेश होतो तर मराठवाड्यातील उसाला हात लावू नये

गंगापूर आणि पैठण तालुक्यातून किमान दहा ते बारा लाख टन ऊस नगर जिल्ह्यातील साखर कारखान्यांना जातो. जायकवाडीच्या पाण्याला राजकीय स्वार्थापोटी विरोध करायचा आणि आर्थिक फायद्यासाठी मात्र ऊस न्यायचा; असा दुहेरी खेळ राजकारणी साखरसम्राट खेळत आहेत. पाणी सोडण्यास विरोध करणाऱ्या कारखान्याने एक तर मराठवाड्यातील उसाला हात लावू नये आणि पैठण आणि गंगापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी नगर जिल्ह्यात साखर कारखान्यांनी ऊस देऊ नये, असे आपले आवाहन आहे

## उर्वरित मंडळनिहाय दुष्काळ घोषित होणार

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती


राज्यात अनेक भागात दुष्काळी परिस्थिती आहे. मंत्रिमंडळ उपसमिती आता वेगवेगळ्या निकषांवर आधारित मंडळ स्तरावर जात आहे. लवकरच दुष्काळी मंडळांचीही घोषणा होईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. केंद्राच्या निकषानुसार, राज्यातील ४० तालुक्यांत दुष्काळ जाहीर झाला आहे. यावरून झालेल्या टीकेनंतर मंत्रिमंडळ बैठकीत ९०० मंडळनिहाय दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करण्याचा निर्णय घेण्यात आला.



याबाबत उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी कुलाबा येथील पालावारची दिवाळी' या कार्यक्रमावेळी पत्रकारांशी बोलताना माहिती दिली. यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा उपस्थित होते. मुंब्रा येथे ठाकरे गट आणि शिंदे गट शनिवारी समोरासमोर आला होता. त्याबद्दल विचारले असता, कालचा दिवस गेला आज नवीन सुरू झाला, असे फडणवीस म्हणाले.

लिंबागणेश ग्रामपंचायत ने दिड महिन्यापुर्वी बसवलेले

## गावातील खांब्यावरील फोकस एकदम खराब दर्जाचे...!



लिंबागणेश ।हरिओम क्षिरसागर

बीड तालुक्यात असणारे लिंबागणेश हे मोठे गावं असून हे जिल्हा परिषद सर्कल चे गाव आहे. त्यामुळे ग्रामपंचायत कार्यालयाला निधी देखील भरपुर मिळत असतो. मात्र गावातील पुढारी तो निधी कसा खाता येईल यातच मग्न असतात. आता ग्रामपंचायत कार्यालयाने अवघ्या दीड ते दोन महिन्यापूर्वी रू. ९९००० एवढे खर्च करुन डएऊलाईट्स खरेदी केल्या होत्या. तसेच त्या अतिशय खराब दर्जाच्या असुन काही लाईटस बसवलेल्या दिवशीच जळाल्या मात्र त्या विद्युत खांबावरील जळालेल्या लाईट्स अजुनही त्याच अवस्थेत आहेत . त्यामुळे गावातील काही गल्ल्या तसेच चौक अंधारात आहेत .

## प्रीमियर लीगला आजपासून सुरुवात

**बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनकडून आयोजन; उद्घाटनास जिल्हाधिकारी, एसपींची उपस्थिती**

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनची बीड प्रीमियर लीग आजपासून (दि.१३) सुरू होणार असून सकाळी १०.३० वाजता उदघाटन झाले. हे स्पर्धेचे सहावे सत्र आहे. स्पर्धेसाठी बीड शहरात नुकतीच खेळाडूंची लिलाव प्रक्रिया पार पडली होती. आजपासून या स्पर्धा सुरू होत आहेत.बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनला ५० वर्ष पूर्ण होत आहेत. या असोसिएशनच्या बीड









प्रीमियर लीगमध्ये १२ संघ सहभागी झाले असून आतापर्यंत २०० वर खेळाडूंनी नोंदणी केली आहे. या स्पर्धेत अनेक बक्षिसे असणार आहेत. स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी दिपा मुधोळ, पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, जिल्हा क्रीडा अधिकारी सुहासिनी देशमुख आदींची उपस्थिती असणार आहे. या उद्घाटन सोहळयास क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर, जिल्हा कार्याध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, जिल्हा सचिव डॉ.आमेर सलीम, महेश वाघमारे, राजन साळवी, इरफान कुरेशी, शुभम धूत, शेख शाकेर, मनोज जोगदंड, आमेर सिद्दीकी, सय्यद शाकेर, रिजवान खान, जावेद पाशा, शेख अझहर, गोपाळ गुरखुदे, आरेफ शेख, सुनील गोपीशेट्टी, सरफराज मोमीन, अतीक कुरेशी, अक्षय नरवडे, पठाण शाहरुख यांनी आवाहन केले आहे.

# लग्नाच्या सोयरीकीत न चुकता विचारला जाणारा सरकारी प्रश्न म्हणजे मुलगा कितवी शिकलाय?

**बहुतांश ग्रामीण भागातली उत्तरे असतात बी.ए. एम.ए डी.एड. वगैरे वगैरे आणी काम काय करतोय तर मात्र उत्तर द्यायला एक तर गफलत होते किंव्हा मग स्पष्ट पणे शेती करतो अस सांगून वेळ मारून नेली जाते.याला कारण सुद्धा असच आहे आयुष्यातले उमेदीचे आणी स्वप्न दाखवणाऱ्या काळात जवळपास पाच– सात वर्ष उच्चशिक्षणात अगदी वेड्यासारखे अभ्यास,पुस्तक,परीक्षा आणी कोणती तरी नोकरी हाती लागेल या मनसुब्याने हा काळ शिक्षणापाई खर्च केला जातो.मात्र कालांतराने जेव्हा हे चक्र जेव्हा संपत आणी वास्तवाकडे वाटचाल होते तेव्हा मात्र मोठी किंमत मोजावी लागते,समाज म्हणून डिग्रीला किंमत उरत नाही तिथे बँक बॅलन्स ने व्यक्तिमत्व ठरवले जातात,मात्र या अवजड वाटणाऱ्या सत्याला नेमक जबाबदार आहे तरी कोण ?**

आपली उघड्या डोळ्यांनी आभाळा एव्हडी स्वप्ने बघणारी वृत्ती की उच्च शिक्षणाच चॉकलेट देऊन बेरोजगारीचे व्रण आपल्या पदरात टाकणारी शासकीय व्यवस्था ? खर तर सुशिक्षित पण बेरोजगार ही राज्याचीच न्हवे तर संपूर्ण भारताची एक विचित्र समस्या का आहे भारतातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांची आव्हाढव्य फौज आणी तिची करणे ही भारतातील बेरोजगारीच्या अनेक पैलूंपैकी एक आहे. सामान्यतः शहरी भागात आढळणारी, सुशिक्षित बेरोजगारी ही एक विरोधाभासी परिस्थिती दर्शवते जिथे शिक्षणाचे रोजगारात रूपांतर होत नाही. औपचारिक शिक्षण असलेल्या व्यक्ती, जसे की पदवी किंवा प्रमाणपत्रे, त्यांच्या पात्रतेनुसार योग्य रोजगार शोधण्यात निष्फळ आहेत. ही समस्या शहरी भागात विशिष्ट वयोगटांमध्ये, विशेषत: पदवीधर आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांमध्ये स्पष्टपणे दिसून येते. तरुण आणि सुशिक्षित व्यक्तींचा सर्वात मोठा ज्ञानाचा दुवा असूनही,भारताला विरोधाभासाचा सामना करावा लागतो जेथे औपचारिक शिक्षणाचे रोजगारात रूपांतर होत . इतर विभागात चांगल्या प्रमाणात नोकरीची अथवा रोजगाराची शास्वती असते मात्र ग्रामीण विद्यार्थ्यांचा बाबतीत यात त्रुटी आढळून येतात, मुळात पूर्वापार नसलेल शिक्षित कुटुंब,सभोवतलाच वातावरण,आणी योग्य वेळेत न मिळेलेले मार्गदर्शन यामुळे सहसा एकाधिक क्षेत्रातच उच्च शिक्षण घेण्याचा निर्णय तरुण घेतात ! चिंतनाचा विषय म्हणजे निरक्षर आणी अशिक्षित व्यक्तींपेक्षा सुशिक्षित लोकांमध्ये बेजोरगरीचे प्रमाण अधिक आहे हे सत्य पाहून आपण किती भयानकतेच्या दारात उभे आहोत याची प्रचितो येते.प्रमुख कारणांमध्ये शैक्षणिक पात्रता आणि उद्योगाच्या गरजा वाढत्या




वयासोबत येणाऱ्या कुटुंबाच्या जबाबदाऱ्या यांच्यात जुळत नाही.. कंत्राटी कार्य पद्धतीची ही संकल्पनाच मुळात स्थिर रोजगाराची अथवा नोकरीची हमी देत नाही ! त्यामुळे शिक्षण आणि उपलब्ध रोजगार यांच्यात असलेली ही खूप मोठी विसंगती आहे. प्रत्येक पालकांची तथा विद्यार्थ्यांची मानसीक विचार शैली प्रबळ आहे ती म्हणजे जेथे शिक्षण, सामान्यत: चांगल्या करिअरच्या संभाव्यतेसाठी एक मार्ग मानले जाते मात्र बऱ्याच अंशी ते शिक्षण आवश्यकपणे रोजगाराकडे नेत नाही. या परिस्थितीचा परिणाम बर्याचदा बेरोजगारीमध्ये होतो, जिथे व्यक्ती त्यांच्या पात्रतेच्या पातळीपेक्षा कमी असलेल्या नोकऱ्या स्वीकारायला भाग पडतात किंवा बेरोजगारी ! तरुण पिढीला नवनवीन गोष्टी नवनवीन तंत्रज्ञान शिकण्यासाठी प्रचंड रस आहे मात्र ते त्यांना फक्त नोकरी आणि भरघोस पगाराचे पॅकेज घेण्यापूर्त मर्यादित राहिलंय. विज्ञान आणि तंत्रज्ञानाची झपाट्याने वाढ आणि त्यानंतरच्या औद्योगिकीकरणामुळे आपल्या जुन्या नैतिक आणि मूल्यांना मोठा धोका निर्माण झाला आहे.




वय,शिक्षण,जबाबदारी आणी शिक्षणाच्या ओझ्याखाली आ वासून उभी असलेली बेरोजगारी हे केवळ एक ज्वलंत सत्य नसून कित्येक तरुण पिढीचा असंतोष आणि विद्रोह या शिक्षण व्यवस्थेच्या मूल्यांच्या ढासळत्या व्यवस्थेचे फलित आहे.सामान्य वर्गातून विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे; अनेक शिक्षण संस्थेत नोकरी साठी भरमसाठ रकमेची मागणी होत असताना दुसरी कडे हेच विद्यार्थी स्वतःसाठी जीवनाच्या किमान गरजा पुरवू शकत नाहीत.टेबलाखालच्या वाढत्या बक्षिसांमुळे ग्रामीण भागातील उच्च - शिक्षित तरुणांपुढे हे नव्याने उभे राहिलेली आर्थिक संकटे वाढली आहेत.. शैक्षणिक संकुलातील वाढता राजकीय प्रभाव ही देखील एक वाईट गोष्ट आहे आणि उच्च शिक्षणाची कदाचित न मिटणारी समस्या आहे. प्रशासकीय मंडळांना त्यांच्या कारभारात कोणताही राजकीय प्रभाव किंवा हस्तक्षेप नको असतो . मात्र प्रबळ राजकीय नेते, आता विविध विद्यापीठांच्या प्रशासकीय संस्थांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहेत, कारण त्यांच्याकडे बहुतेक संस्था आहेत, शिक्षण (अनुदानित-विनाअनुदानित). त्यांनी स्वतःचे युवा सेल स्थापन करून राजकीय आधारावर विद्यार्थी संघटनांना प्रोत्साहन दिले आहे. ते त्यांच्या राजकीय हेतूंसाठी विद्यार्थ्यांच्या आणी सोबतच शिक्षकांच्या ऊर्जेचा देखिल वापर करतात. विद्यार्थी स्वतःची उद्दिष्टे प्राप्त करण्याची,शिक्षक प्राध्यापक त्यांच्या पगारीची आणी राजकीय मंडळी त्यांच्या राजकीय भविष्याची सांगड घालताना दिसतात. यात प्रामुख्याने भरडला जातो तो सर्वसामान्य घरातला उच्च शिक्षित तरुण,आयुष्यातले महत्वाचे दिवस शिक्षणासाठी खर्च करून सुद्धा त्याच्या आयुष्यात शेवटी बेरोजगारीच्या भीषण आयुष्याचा नवा अध्याय सुरु होतो !

– परमेश्वर घुंगासे ९६२३११५४९६ जालना

# राज्यात पुढील २४ तासांत अवकाळी बरसणार

राज्यात गेले काही दिवस अनेक जिल्ह्यात जोरदार पावसानं हजेरी लावली आहे. राज्यात पुढील २४ तासांत पावसाची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. देशासह राज्यात अवकाळी पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे. अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने राज्यासह देशात ढगाळ वातावरण निर्माण झालं असून अनेक भागांत मेघगर्जनेसह पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे. राज्यासह देशात विविध ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आयएमडीने वर्तवली आहे. राज्यात थंडी पडण्यास सुरुवात झाली असून नोव्हेंबरच्या शेवटी थंडीचा जोर वाढणार असल्याचं हवामान खात्यानं म्हटलं आहे.

राज्यात अवकाळी बरसणार




राज्यात गेले काही दिवस अवकाळी पावसाची हजेरी पाहायला मिळत आहे. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार आजही पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पुढील २४ तासात राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. आज कोकण आणि मध्य महाराष्ट्रात पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. रत्नागिरी, कोल्हापूर, सातारा आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये आज अवकाळी पावसाची हजेरी पाहायला मिळणार आहे. दरम्यान, मुंबईसह, पुणे, सातारा आणि कोकण किनारपट्टी भागात काही ठिकाणी रविवारी तुरळक ठिकाणी पाऊस झाला आहे. तर काही भागात ढगाळ वातावरण पाहायला मिळालं. दुपारी मात्र उन्हाचा चटका बसत होता.

थंडीचा जोर वाढला

भारतीय हवामान विभाग नुसार, देशातील काही भागात पाऊस आणि वादळाची शक्यता आहे. पश्चिम हिमालयीन भागात झालेल्या बर्फवृष्टी झाली आहे. त्यामुळे देशातील अनेक राज्यांमध्ये थंडीचा कडाका वाढला आहे. दिल्लीतही तापमानात घसरण्यास सुरूवात झाली असून थंडीचा जोर वाढला आहे. दिवाळीनंतर पुन्हा एकदा प्रदूषणात वाढ झाली आहे.

# छत्रपती संभाजीनगर शहरात फटाक्यांमुळे १० ठिकाणी आगीच्या घटना

छत्रपती संभाजीनगर : देशभरात दिवाळी मोठ्या उत्साहात साजरा केला जात असतानाच दुसरीकडे, लक्ष्मीपूजनाच्या दिवशी छत्रपती संभाजीनगर शहरात वेगवेगळ्या आगीच्या घटनेत मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या घटनांमध्ये सुदैवाने कोणालाही दुखापत झाली नाही. दरम्यान, आगीच्या घटनेत १५ लाखांचे नुकसान झाले आहे. तर, काही फायर कॉलनंतर अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणल्याचे पाहायला मिळाले.



लक्ष्मीपूजनाच्या दिवशी रात्री दहाच्या सुमारास छत्रपती संभाजीनगर शहरातील विविध ठिकाणी आग लागल्याच्या तब्बल दहा घटना घडल्या. या सर्व आगीच्या घटना किरकोळ असून नागरिकांनी योग्य ती खबरदारी घेऊन अग्निशमन विभागाला त्याबाबत सूचना दिल्याने सुदैवाने मोठी हानी टळली. या घटनांमध्ये कोणालाही दुखापत झालेली नसल्याची माहिती अग्निशमन विभागाचे प्रमुख शिवाजी झन झनझन यांनी दिली.शहरात लगलेल्या आगीच्या घटनांमध्ये दिवाण देवडी, उस्मानपुरा, सातारा परिसर नक्षत्र वाडी पानचक्की परिसर, चिकलठाणा परिसर या ठिकाणी आग लागली. नक्षत्र वाडीतील एका एका सोसायटीतील सहाव्या मजल्यावर आग लागली होती.

## पहिल्या दिवशी शहरात दहा घटनांमध्ये आगीमुळे १५ लाखांचे नुकसान

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी शहरात मोठ्या उत्साहात नागरिकांनी फटाक्यांची आतिषबाजी केली. मात्र, यामुळे काही ठिकाणी आगीच्या घटना देखील समोर आल्या आहेत. लक्ष्मीपूजनानिमित्त उडवल्या गेलेल्या फटाक्यांमुळे अनेक ठिकाणी कचरा पेटल्याने आग लागल्याचे समोर आले. शहरात एकूण १० ठिकाणी आगीच्या घटना समोर आल्या आहेत. मात्र, या सर्व आगीच्या घटना किरकोळ असून यामध्ये कोणालाही दुखापत झालेली नाही. दिवाळीच्या पहिल्या दिवशी शहरात दहा घटनांमध्ये आगीमुळे १५ लाखांचे नुकसान झाले आहे. मात्र, सुदैवाने कुठेही जीवितहानी झालेली नाही.

# राज्यभरात किमान तापमानात २ अंशाने घट

१७ नोव्हेंबरपासून थंडी वाढणार, छत्रपती संभाजीनगरच्या किमान तापमानात चढ-उतार

प्रतिनिधी । नाशिक

अरबी समुद्रातील कमी दाबाचे क्षेत्र निवळल्याने वातावरण कोरडे झाले असून राज्यात बहुतेक ठिकाणी किमान तापमानात २ ते ३ अंशाने घसरण झाली आहे. राज्यात येत्या १७ नोव्हेंबरपासून थंडीचा कडाका वाढणार आहे. कमी दाबाच्या क्षेत्रामुळे गत आठवड्यात ठिकठिकाणी हलका ते मध्यम पाऊस झाला. त्यानंतर कोकण वगळता उर्वरित राज्यात



ढगाळ वातावरण होते.रविवारपासून नाशिकसह उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भात किमान तापमानात घट झाली होती. त्यामुळे वातावरणात गारवा जाणवत होता. तथापि, छत्रपती संभाजीनगरचे किमान तापमान तीन दिवसांमध्ये कमी-अधिक होत आहे. शुक्रवारी १६.६, शनिवारी १८ आणि रविवारी पुन्हा १७ अंश सेल्सियस किमान तापमानाची नोंद झाली आहे.राज्यातील प्रमुख शहरांतील किमान तापमान असे राहिलेधुळे १४ निफाड १५ नाशिक १७ संभाजीनगर १६.२ बीड १९.० जळगाव १७.० नांदेड १९.६ सोलापूर २१.५ अकोला १८.२ नागपूर १७.२

# फटाके फोडताना जरा जपून, राज्यात किती मोठं नुकसान झालय ते एकदा वाचा

मुंबई : राज्यात दिवाळीचा सण उत्साहात साजरा होत असताना काही ठिकाणी आगी लागण्याच्या घटना घडल्या. काल लक्ष्मीपूजन होतं. राज्यात सर्वत्र मोठ्या प्रमाणात फटाके फोडण्यात आले. फटाके फोडण्यासाठी घालून दिलेल्या वेळ मर्यादेच सर्रास उल्लंघन करण्यात आलं. दरम्यान राज्याच्या वेगवेगळ्या भागात आग लागण्याच्या घटना घडल्या. भिवंडीत आगीचे सत्र सुरू असून भिवंडी शहरातील मार्केट परिसरात मिराकल मॉलच्या समोर असलेल्या इलेक्ट्रिक दुकानात मध्यरात्रीनंतर अचानक आग लागली. आग इतकी भीषण होती की, या आगीमुळे इलेक्ट्रिक दुकानासहीत युनानी दवाखाना, कपड्याचे दुकान अशी चार दुकानं आगीत जळून खाक झाल्याची घटना घडली आहे. आगीची माहिती मिळतात स्थानिकांनी तात्काळ इमारतीमध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांना सुखरूप बाहेर काढले. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाच्या तीन गाड्या दाखल झाल्या व तब्बल दोन तासाच्या अथक प्रयत्नानंतर या आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. परंतु तोपर्यंत या आगीत चार दुकानं जळून खाक झाली होती. आग कशामुळे लागली हे अजूनही स्पष्ट झालेलं नाही.

नाशिकच्या मेनरोड रेड क्रॉस सिग्नल परिसरात असलेल्या वर्धमान या कपड्याच्या शोरुमला भीषण आग लागली. अग्निशमन दलाचे १० हून अधिक बंब घटनास्थळी दाखल झाले. आग आटोक्यात आली. पण आत्ता पर्यंतलागून असलेली ३ हून अधिक दुकाने आगीच्या भक्षस्थानी पडली. येवल्यातील नाकोडा फॅशन ड्रेसेस दुकानाला भीषण आग. आगीत लाखो



रुपयांचा माल जळून खाक. शर्थीचे प्रयत्न करुन अग्निशामक दलाने ही आग विझवली. आग भीषण असल्याने स्थानिक नागरिकांची ही आग विझवण्यासाठी मदत केली. आगीचे कारण अस्पष्ट आहे. फटाक्याच्या आतिषबाजीमुळे आग लागल्याची जोरदार चर्चा.




# !! दिवाळी विशेष !! आकाशदीप


**प्रतिवर्षी दिवाळी हा सण आला कि घरोघरी आकाशदीप (आकाशकंदील) लावतात.आकाश दीप लावण्याची प्रथा हि हिंदु धर्मात पूर्वीपासून चालत आलेली आहे. या रूढी, परंपरा यांना काळानुसार बदलते स्वरूप प्राप्त होत गेले.त्यामुळे त्याचे असणारे महत्व कुठेतरी लोप पावत असून केवळ एक सण आणि त्यामधील कृती किंवा काही अंशी एक हौस म्हणून हे केले जात असल्याचे लक्ष्यात येते.**

**आजकाल बजारात अनेक नवीन नवीन आकारात,नावीन्य पूर्ण वाटणाऱ्या वस्तूंचा उपयोग करून आकाशदीप बनविले जात आहेत. गेल्या काही वर्षांपासून तर चिनी बनावटीच्या आकाशकंदिलांचा मोठ्या प्रमाणात वापर होऊ लागला आहे. परंतू असे करताना आकाशदीप (आकाशकंदील) लावण्यामागील शास्त्र,इतिहास काय आहे हे जाणून घेतले तर त्यातून योग्य कृती करण्याचा प्रत्यन होऊ शकतो.यासाठी हा लेख लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.**

मूळ शब्द 'आकाशदीप' असा आहे. हल्ली तुपाच्या दिव्याच्या जागी विजेचा दिवा आल्याने त्याला आकाशकंदिल म्हटले जाते. घराच्या द्वारात टांगलेल्या आकाशदीपामुळे घराभोवती असलेल्या वायुमंडलाची शुद्धी होते. याचेच प्रत्यक्ष वास्तूत टांगण्याचे दुसरे रूप म्हणजे लामणदिवा !

आकाशदीप इतिहास - त्रेतायुगामध्ये आकाशदीपाची संकल्पना जन्माला आली. रामराज्याभिषेकाच्या वेळी श्रीरामाच्या चैतन्याने पुनित झालेल्या वायुमंडलाचेही स्वागत घरोघरी असे आकाशदीप टांगून केले गेले.आकाशदीप रचना - आकाशदीपाचा मूळ आकार हा कलशासारखा असतो. हा मुख्यतः चिकण मातीचा बनवलेला असतो. याला मध्यभागी, तसेच वरच्या बाजूला गोलाकार रेषेत एक-दोन इंचावर गोलाकार छिद्रे असतात. आत तुपाचा दिवा ठेवण्यासाठी मातीची बैठक केलेली असते.

आकाशदीप लावण्याची पद्धत - हा आकाशदीप वास्तूच्या प्रवेशद्वारावर उजव्या हाताला (कार्यरत शक्तीचे प्रतीक) टांगतात. तिन्हीसांजेला मातीच्या घुमटाकार कलशात मातीच्या छोट्याशा बैठकीवर अक्षता ठेवून त्यावर तुपाचा दीप ठेवतात आणि त्यावर मातीचेच मध्यभागी टोक असलेले झाकण ठेवतात.त्रेतायुगातील रामराज्याभिषेकाच्या वेळीअंगणात अडकवलेला



आकाशदीप 'ज्योतीकलश'

अंधार्या रात्री आकाशदीपाचे लांबून दर्शन घेतल्यास मातीचा कलश अंधारामुळे दिसत नाही; पण कलशात तेवणार्या ज्योतीचा प्रकाश कलशाला पाडलेल्या भोकांच्या ओळींतून बाहेर पडल्यामुळे 'प्रत्येक भोक म्हणजे मंद तेवणारी एक एक ज्योत आहे', असे वाटते. त्यामुळे आकाशदीपाचे दृश्य म्हणजे कलशाच्या आकाराच्या ज्योतींचा समूह असल्याचा भास होतो. कलशाभोवती विरळ अशी प्रभावळ निर्माण झाल्याने कलशातून प्रकाशाचा प्रवाह बाहेर ओसंडून वहात आहे, असे मनमुग्ध दृश्य दिसते. त्यामुळे त्रेतायुगातील रामराज्याभिषेकाच्या वेळी अंगणात अडकवलेल्या आकाशदीपाचे नाव 'ज्योतीकलश' असे ठेवण्यात आले.

## आकाशदीपाचा वाईट शक्तींवर परिणाम होणे !

तुपाच्या दिव्याकडे ब्रह्मांडातील देवतांच्या सात्त्विक लहरी आकृष्ट होतात. झाकणाच्या टोकातून कारंज्याप्रमाणे वातावरणात प्रक्षेपित केल्या जातात. यामुळे वातावरणाच्या पट्ट्यात सात्त्विक लहरींचे सूक्ष्म-छत बनते. दिव्याखालील अक्षतांकडून सात्त्विक लहरी ग्रहण होऊन खालच्या दिशेने प्रक्षेपित होतात. यामुळे भूमीवर सात्त्विक लहरींचे सूक्ष्म-आच्छादन बनते. मातीच्या कलशाला असणार्या भोकातून प्रक्षेपित होणार्या वेगवान प्रकाशलहरींचा आणि त्यातून निर्माण होणार्या सूक्ष्म नादाचा वाईट शक्तींना त्रास होतो. त्यामुळे सहसा आकाशदीपाच्या संपर्कात येण्याचे वाईट शक्ती टाळतात. साहजिकच वाईट शक्तींचा वास्तूभोवती असणारा संचार न्यून होतो. चिकण मातीमध्ये पृथ्वीपेक्षा आपकणांचे प्रमाण जास्त असल्याने तिची सात्त्विक लहरी प्रक्षेपण करण्याची क्षमताही जास्त असते. आकाशदीप हा टांगलेल्या अवस्थेत असल्याने एकाच वेळी वायुमंडलातील ऊर्ध्वगामी आणि अधोगामी वहाणार्या वायुलहरींची शुद्धी होण्यास साहाय्य होते. कालांतराने दीपातून आणि अक्षतांतून प्रक्षेपित होणार्या सात्त्विक लहरींमुळे वास्तूभोवती संरक्षककवच निर्माण होते. त्यामुळे तिन्हीसांजेपासून वाढत्या प्रमाणात कार्यरत होणार्या वाईट शक्तींपासून वास्तूचे रक्षण होते.

आकाशकंदिल लावण्यामागील शास्त्र -

१. पाताळातून घरात येणार्या आपमय लहरींना घराच्या बाहेरच्या बाजूस लावलेल्या आकाशकंदिलातील तेजतत्त्वाच्या लहरींनी थांबवणेदिवाळीच्या काळात आपमय तत्त्वतरंगांशी निगडित अधोगामी लहरींचे ऊर्ध्व दिशेस प्रक्षेपण होण्यास सुरुवात होते. त्यामुळे पूर्ण वातावरणात जडत्वता येऊन वाईट घटकांचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे घरात जडत्वतेचा समावेश होऊन पूर्ण वास्तू दूषित होते. हे थांबवण्यासाठी दिवाळीत आधीपासूनच घराबाहेर आकाशकंदिल लावला जातो. आकाशकंदिलात तेजतत्त्वाचा समावेश असल्यामुळे ऊर्ध्व दिशेतून कार्यरत होणार्या आपमय लहरींवर आळा बसून तेजतत्त्वाच्या जागृतीदर्शक लहरींचे घरात वर्तुळात्मक संचारण होते; म्हणून घराच्या बाहेरच्या बाजूस आकाशकंदिल लावतात.

२. ब्रह्मांडात संचारत असलेले लक्ष्मीतत्त्व आणि पंचतत्त्व यांचा आकाशकंदिलामुळे लाभ होणे दिवाळीच्या दिवसांत ब्रह्मांडात वाईट

घटकांच्या निर्मूलनासाठी श्री लक्ष्मीतत्त्व कार्यरत असते. या तत्त्वाचा लाभ करून घेण्यासाठी पंचतत्त्वाच्या सर्व स्तरांचे एकत्रिकरण करून त्याला वायूतत्त्वाच्या गतीमानतेच्या आकर्षणातून आकाशपोकळीच्या संचारणातून ग्रहण केले जाते; म्हणून आकाशकंदिल घराबाहेर उंच जागी लावला जातो. त्यामुळे ब्रह्मांडात संचारणार्या तत्त्वाचा लाभ होतो.

आपणा सर्वांना दीपावली पाडवा व भाऊबीज च्या हार्दिक शुभेच्छा.

लेखक :- ड रविंद्र लक्ष्मण काटकर
( जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय)

# शरद पवार ९९ टक्के कन्व्हेन्स, मोठा बॉम्ब फुटू शकतो ;रवी राणा यांचं मोठं वक्तव्य

**अमरावती । प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सध्या अनेक घडामोडी घडत आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार हे गेल्या काही दिवसांपासून आजारी आहेत. त्यांना डेंग्यूची लागण झालीय. त्यांच्यावर उपचार सुरु असल्याची माहिती समोर येत होती. पण काल अचानक मोठी बातमी समोर आली. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि अजित पवार यांची भेट झाल्याची माहिती समोर आली. दोन्ही नेत्यांमध्ये जवळपास तासभर चर्चा झाली. या भेटीनंतर अजित पवार लगेच पुण्याहून दिल्लीच्या दिशेला रवाना झाले.**

अजित पवारांनी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. त्यानंतर खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या निवासस्थानी संध्याकाळी अजित पवार गटाची महत्त्वाची बैठक पार पडल्याची माहिती समोर आली आहे. या सगळ्या घडामोडींवर आता आमदार रवी राणा यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. शरद पवार लवकरच भाजपला पाठिंबा देतील, असं स्पष्ट वक्तव्य रवी राणा यांनी केलंय. त्यामुळे चर्चांना उधाण आलंय.

शरद पवार लवकरच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठिंबा देतील, असं रवी राणा यांनी म्हटलं आहे. अजित पवारांच्या भेटीमुळे शरद पवार ९९ टक्के कन्व्हेन्स झाले आहेत, असं रवी राणा म्हणाले आहेत. मी आधीच सांगितलं होतं, दिवाळीच्या आसपास मोठा बॉम्ब फुटू शकतो, असं रवी राणा म्हणाले आहेत.

मी आधीच दसरा सणाच्या वेळी सांगितलं होतं की, शरद पवार हे महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते आहेत. दिवाळीच्या आधी मोठा फटका फुटू शकतो किंवा दिवळीच्या आसपास मोठा बॉम्ब फुटू शकतो. अजित पवार यांनी ज्या पद्धतीने शरद पवारांची भेट घेतली आहे, मला असं वाटतं की ९९ टक्के शरद पवार कन्व्हेन्स झाले आहेत. आता थोडासा धक्का लागायला पाहिजे, असं मत रवी राणा यांनी व्यक्त केलंय.

शरद पवार लवकरच नरेंद्र मोदींना पाठिंबा देतील. ते भाजप सरकारसोबत येतील. शरद पवार आणि अजित पवार यांच्यातील संघर्ष संपेल आणि मोठं ताकदवान



सरकार या महाष्ट्रात उभं राहील. जे समीकरणं दिल्ली स्तरावर चालू आहेत, आजपर्यंत ज्या घटना झालेल्या आहेत त्या अचानक झालेल्या आहेत. अशाचप्रकारे शरद पवार सोबत आले तर सरकारला आणखी ताकद मिळेल. सक्षम मजबूत सरकार महाराष्ट्रात काम करेल, असा दावा रवी राणा यांनी केलाय.

# इस्रायलने रात्रीतून हल्ले वाढवले




## युद्धबंदीस नकार:गाझात तुंबळ युद्ध, नेतन्याहू अद्याप भूमिकेवर ठाम

इस्रायलने । वृत्तसंस्था

रविवारी रात्री मुख्य गाझा शहरातील काही भागावरील जोरदार केले. इस्रायलच्या पायदळ सैन्याने गाझातील सर्वात मोठ्या रुग्णालय भागाला लक्ष्य केले. या हल्ल्यामुळे हजारो वैद्यकीय अधिकारी, असंख्य रुग्ण, विस्थापित नागरिकांचे हाल झाले. अनेक लोक अडकले आहेत. हल्ला केलेल्या शिफा रुग्णालयात घबराट पसरली आहे. आरोग्य मंत्रालयाचे म्हणणे आहे की शिफा येथे अजूनही १५०० रुग्ण, दीड हजारावर वैद्यकीय कर्मचारी आणि पंधरा हजार ते वीस हजार लोक आश्रय घेत आहेत. शिफा आणि इतर रुग्णालयांमधून हजारो लोक पळून गेले आहेत, परंतु डॉक्टरांनी सांगितले की प्रत्येकासाठी बाहेर पडणे अशक्य आहे. पॅलेस्टिनी रेड क्रिसेंट रेस्क्यू सर्व्हिसने म्हटले आहे की गाझा शहरातील आणखी एक रुग्णालय, अल-कुड्स, आता कार्यरत नाही. कारण त्यांचे इंधन संपले आहे. गाझाचा एकमेव वीज निर्मिती प्रकल्प एका महिन्यापूर्वी बंद पाडण्यात आला. त्याशिवाय इस्रायलने कोणत्याही इंधन आयातीवर बंदी घातली आहे, शनिवारी दूरचित्रवाणीवरून संबोधित करताना पंतप्रधान बेंजमिन नेतन्याहू यांनी युद्धबंदी होणार नसल्याचा पवित्रा घेतला. आंतरराष्ट्रीय समुदायाकडून त्यांना शांततेसाठी आवाहन केले जात होते. त्यातून त्यांच्यावर दबाव वाढत होता. परंतु त्यांनी आंतरराष्ट्रीय आवाहन नाकरले. हमासने ७ ऑक्टोबरला पकडलेल्या २४० ओलिसांची सुटका केलेली नाही.गाझा शहरातील, रहिवाशांनी शिफा हॉस्पिटलच्या आसपासच्या भागासह रात्रभर जोरदार हवाई हल्ले आणि गोळीबार झाल्याची तक्रार केली. हमासने हॉस्पिटलच्या आवारात आणि अंतर्गत कमांड पोस्ट लपवल्याचा आरोप केला आहे.

# डिस्चार्जनंतर मनोज जरांगेंची पहिली सभा



प्रतिनिधी । दावरवाडी

एकही जिल्हा असा नाही की त्या जिल्ह्यात कुणबी नोंद नाहीत. महाराष्ट्रात ५० टक्के कुणबी नोंदी सापडल्या आहेत. ज्या नोंदी आहेत त्या आधारावरच सरसकट आरक्षण देण्यात यावे, जितकं पाणी गरजेचे आहे, तितकेच आरक्षणही गरजेचे आहे. त्यामुळे आता मराठा आरक्षण मिळाल्याशिवाय माघार घेण्यात येणार नाही, दिलेल्या कालावधीत सरकारने योग्य निर्णय न घेतल्यास २४ डिसेंबरनंतर पुढील दिशा ठरवणार असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले.

मनोज जरांगे पाटील यांना दवाखान्यातून शनिवारी डिस्चार्ज मिळाल्यानंतर रविवारी (१२ नोव्हेंबर) दुपारी ४ वाजता दावरवाडी (ता. पैठण) येथे पहिली जाहीर सभा घेतली. याप्रसंगी ते बोलत होते. जरांगे पाटील पुढे म्हणाले, जोपर्यंत मराठा आरक्षण मिळत नाही तोपर्यंत मी घरांचा उंबरठा ओलांडणार नाही. सभेतील उपस्थितांना उद्देशून तुम्ही आतापर्यंत नेते व त्यांची मुले मोठी केली, पण तुमच्या पोटच्या मुलांचे काय? मराठा ओबीसी नव्हते तर आता पुरावे कसे सापडताहेत, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. या सभेसाठी दावरवाडीसह नांदर, कौंदर, कुतुबखेडा, सालवडगाव, वडजी, थेरगाव, दादेगाव, नाने पुसेगाव, खेर्डा, डेरा, रहाटगाव, सोलनापूर आदी गावांसह तालुक्यातील शेकडो महिला,पुरुषांची उपस्थिती होती.

# मराठा आरक्षणासाठी आणखी एकानं जीवन संपवलं

## २५ वर्षीय तरुणानं उचलंल टोकाचं पाऊल

**एकीकडे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठ्यांनी एल्गार पुकारला आहे. परंतु, दुसरीकडे आरक्षणासाठी अनेक मराठा आंदोलक ) टोकाचं पाऊल उचलत आपलं आयुष्य संपवत आहेत. मराठा आरक्षणाच्या मागण्यांसाठी होत असलेल्या आत्महत्यांचं सत्र काही थांबण्याच नाव घेत नाही. आरक्षणासाठी आणखी एका तरुणानं आत्महत्येसारखं टोकाचं पाऊल उचललं आहे. नांदेडमधील एका २५ वर्षीय तरुणानं मराठा समाजाला आरक्षण मिळावं या मागणीसाठी विष प्रशान करून आत्महत्या केली आहे.**

नांदेडपासून जवळच असलेल्या मरळक येथली घटना आहे. दाजीबा रामदास शिंदे असं मृत तरुणाचं नाव आहे. ११ नोव्हेंबरला विष प्रशान केल्यानंतर दाजीबा कदमला नांदेडच्या शासकीय रुग्णालयात भरती करण्यात आलं होतं. दाजीबा कदम यांच्याजवळ एक सुसाईड नोटही आढळून आली. सुसाईड नोटमध्ये समाजाला आरक्षण मिळत नसल्यामुळे आत्महत्या करत आहे, असा मजकूर सुसाईड नोटमध्ये लिहिण्यात आला होता. पोलिसांनी सुसाईड नोट जप्त केली असून दाजीबाचा मृतदेह पोस्टमार्टमसाठी पाठवण्यात आला आहे.

दाजीबा कदम हा मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या आंदोलनात सहभागी झाला होता, दाजीबा कदम यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी केली होती. आरक्षण नसल्यामुळे दाजीबा काही करू शकला नाही, तसेच त्याच्या वडिलांनी त्यांची दीड एकर शेती विकली होती, असं मृत दाजीबाच्या भावानं सांगितलं, शासनाकडून लवकरात लवकर मदत मिळावी, यासाठी प्रयत्न करू, असं तहसीलदार विजय आवधान यांनी सांगितलं. तसेच, मराठा आरक्षणावर तात्काळ तोडगा काढावा, अशी मागणी विठ्ठल पावडे यांनी केली आहे.

मनोज जरांगे हे १५ नोव्हेंबर ते २३ नोव्हेंबर असा राज्याचा दौरा करणार आहे. या दौऱ्यात ते गावागावात सभा घेणार आहे. एकूण ६ टप्प्यात हा दौरा असणार आहे. या दौऱ्यात जरांगे हे ठाणे, पालघर, नाशिक, त्र्यंबकेश्वर,नेवासा, संगमनेर आणि श्रीरामपूर यासह अनेक ठिकाणी भेट देणार आहे. सोबतच १ डिसेंबरपासून राज्यातील प्रत्येक गावागावात साखळी उपोषण केले जाणार असल्याचे जरांगे म्हणाले आहे. विशेष म्हणजे आपल्या या दौऱ्यात प्रत्येक ठिकाणी मनोज जरांगे हे आरक्षणासाठी आत्महत्या करू नका असे आवाहन करणार आहे.

# सह्याद्रीचे भुते संस्थेने लाल महाल एक हजार दिवेनी उजळवला .....!

## सह्याद्रीचे भुते सामाजिक संस्थाकडून शिवप्रताप दिन व दिपोत्सव लाल महालात साजरा

**केज/प्रतिनिधी**

**पुणे येथील लाल महाल येथे दि.१० नोव्हेंबर २०२३ (शिवप्रतापदिन) रोजी पुणे येतील सुप्रसिद्ध असलेल्या लाल महाल येथे सह्याद्रीचे भुते सामाजिक संस्था कडून एक हजार दिवे प्रज्वलीत करून शिवप्रतापदिन आणी दिपोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. छत्रपती शिवरायांनी याच दिवशी अफजलखानाचा कोथळा काढला होता. स्वराज्याचा मधला सगळ्यात मोठा बाधा त्यांनी दूर केली होती. म्हणुन हा शिवप्रतापदिन अवघा महाराष्ट्र साजरा करतो.विविध कार्यक्रम करून या दिवसाची महती जो तो आपल्या स्तरावर प्रसार माध्यमाच्या साह्याने इतरां पर्यंत पोहचवत असतो.असेच यादिवसाचे महत्व सामाजिक शिवकार्य करणाऱ्या मुलांना प्रेरणादायी ठरावे म्हणून सह्याद्रीचे भुते सामाजिक संस्था कडून लाल महाल येथे मोठ्या उत्साह आणी जोशात कार्यक्रम घेतला.**

या कार्यक्रम मध्ये वैचारिक शिदोरी देण्यात आली.या दिवसाचे महत्व काय आहे हे सांगण्यात आले.चालू वर्ष शिवराज्याभिषेक सोहळ्याचे ३५० वे वर्ष असल्याने,ज्यांच्या मुळे देव्हाऱ्यात देव राहिले अशा छत्रपती शिवरायां च्या चरणा जवळ दिपावलीचा पहिला दिवा लागला पाहिजे अशा मुळे,नवीन नवीन मुलांना गडकिल्ले यावर दिपोत्सव साजरा करायचा असतो. परंतु लाल महाल सारख्या ऐतिहासिक वास्तू मध्ये जेथून स्वराज्य उभे राहिले अशा वास्तू मध्ये सोहळा साजरा व्हावा म्हणुन सह्याद्रीचे भुते संस्थेकडून एकमत झाले आणी या वर्षी शिवप्रताप दिन आणी दिपावली सोबत आल्याने हा कार्यक्रम लाल महाल येथे एक हजार दिवे लावुन लाल महालाच्या इतिहासाला पुन्हा एकदा उजाळा देण्याचे काम सह्याद्रीचे भुते या संस्थेकडून करण्यात आले.कार्यक्रमा मध्ये सुशोभीत रांगोळी काढून श्रीमान रायगड किल्ल्याची प्रतिकृती तयार करण्यात आली होती. ३५० दिवे लाऊन मावळ्यांनी नावसाकारले. लाल महाल मधीलपरिसर हा दिव्यांनी उजळून निघाला होता.फुलांच्या माळा,दीपावली साठी खास आकाश कंदील लावुन



लाल महालामध्ये हा सोहळा पार पडला.


शिवप्रतापदिन सोहळा साजरा करण्यासाठी आणी दीपावलीचा पहिला दिवा लावण्या साठी सह्याद्रीचे भुते संस्थेकडून स्वराज्या मधील सरदार घराणे मधील शिर्के घराण्याचे वंशज दिपकराजे शिर्के,मालुसरे घराण्याचे वंशज सुभेदार श्री.कुणालजी मालुसरे, शिळीमकर घराण्याचे वंशज श्री.मंगेश दादा शिळीमकर,मोहीतेघराण्याचेवंशज श्री.राजेंद्र मोहीते, मरळ घराण्याचे वंशज श्री.प्रदीप मरळ,इंदलकर घराण्याचे वंशज श्री.समीर इंदलकर,कंक घराण्याचे वंशज श्री.रविंद्र कंक, गाडे घराण्याचे वंशज श्री. अमित गाडे,मोहीते घराण्याचे वंशज श्री. संदीप मोहीते,गायकवाड घराण्याचे वंशज श्री. शिवदत्त गायकवाड,या सरदार घराण्याचे वंशज या कार्यक्रमाला उपस्थित होते.सह्याद्रीचे भुते संस्था व मित्र संघटने मधुन संघटनाचे प्रमुख पैकी पै. श्री.भुषण वरपे (विश्व हिंदू मराठा संघ),श्री.दिनेश ढगे (युवा साम्राज्य सेना),श्री. रोहित भोसले(रुबाबदार मराठा),श्री.ओंकारवाळुंज (शिवमुद्राफाउंडेशन),श्री. सचिन भोसले(छत्रपती शासन),श्री.वैभव साळुंखे (छत्रपती संभाजीमहाराज सेवा समिती),श्री.आप्पा साहेब कदम (शंभूराजे प्रतिष्ठान),श्री.संजय गायकवाड(स्वराज्य)अशी मान्यवर मंडळी या कार्यक्रमाला उपस्थित होते.तसेच सह्याद्रीचे भुते संस्थे मधुन प्रामुख्याने मितालीताई गरड,मिताली ताई कदम,सुनीता खंदारे, स्वरा खंदारे,ऋतुजा जाधव,श्रुतीचौधरी,राजश्री पाटोळे,पुर्वा काळे, सोनाली पाटोळे,प्रियंका कदम,श्री.प्रथमेश सांगळे, पांडुरंग पौळ,मोहन कदम, वैभव टकले,राहुल सोमासे,बसवेश्वर व इतर आणी श्री.राज दादा तपसे हे प्रामुख्याने उपस्थितीत होते.

# वरील धरणातून पाणी सोडण्यास उशीर

## कोरडे पडणारे गोदापात्र, बेसुमार वाळू उपशामुळे ८ टीएमसीपैकी निम्मेच पाणी येणार जायकवाडीत

नाशिक व नगरमधील गंगापूर, गोदावरी-दारणा, मुळा या धरणातील ८.६ टीएमसी पाणी मराठवाड्यातील जायकवाडी धरणात सोडण्याचा निर्णय घेण्यात आला. पण त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र आहे. पाणी सोडण्यास जितका उशीर होईल तितक्या पाण्याचा अपव्यव होईल आणि ८.६ पैकी निम्मेच पाणी जायकवाडीत पोहोचेल. यापूर्वी १ नोव्हेंबर २०१८ रोजी समन्यायी पद्धतीने पाणी वाटपानुसार ८.९९ टीएमसी पाणी वरील धरणातून सोडण्यात आले होते. पण जायकवाडीत केवळ ४.६० टीएमसीच पोहोचले होते. त्यामुळे पाणी सोडण्यास विलंब होऊ नये अन्यथा दोन्ही भागांना या याचा फायदा नाही.

यावर्षी केवळ वरील धरणातून ओव्हरफ्लो झालेले पाणी जायकवाडीत सोडले गेले. त्यामुळे जायकवाडीचा पाणीसाठा ४७ टक्क्यांवर आला. मात्र त्यातून पैठणमधील दोन बंधारे व दोन्ही कालव्यातून मराठवाड्यातील शेतीला पाणी दिल्याने आता धरणात ४४ टक्के पाणी शिल्लक राहिले आहे. समन्यायी पद्धतीने ३० ऑक्टोबरला पाच धरणातून जायकवाडीत पाणी सोडण्यात येणार होते, ते आजपर्यंत सोडले गेले नसल्याने मराठवाडा विरुद्ध पश्चिम महाराष्ट्र असा संघर्ष सध्या सुरू होत आहे. मुळा, दारणा, पालखेड, गंगापूर या धरणाचे अंतर व नदी पात्रातील खड्डे पाहता पाणी वहनाचा वेग मंदवणार आहे. यात



पुढील दोन दिवसांत पाणी सोडले तरीही साधारणपणे साडेपाच टीएमसी पाणी जायकवाडीत येईल, असे पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, यापूर्वी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे महामंडळाचे कार्यकारी संचालक सी.ए. बिराजदार असताना त्यांनी पाणी सोडण्यात वेळकाढूपणा केला होता. ही बाब महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या निदर्शनास आणून दिली होती.

**वरील धरणातून पाणी सोडण्यास जितका उशीर तितके जमिनीत मुरणार पाणी**

### अवैध वाळू उपशामुळे झाले खड्डे; पाण्याला मोठ्या प्रमाणात अडथळा

नाशिक ते पैठण गोदावरी नदीपात्रात वर्षभर बेसुमार अवैध वाळूचा उपसा झाला आहे. कायगाव टोका ते जायकवाडी धरण हा काही किमीचा गोदावरीचा भाग वगळता गोदावरीत मोठे खड्डे आहेत. या खड्ड्यांमुळे पाण्याच्या वहनाचा वेग कमी होणार आहे. त्यामुळे साधारणपणे मुळा धरणातून पाणी सोडल्यास २२ तासांत जायकवाडीत दाखल होऊ शकते, असे पाटबंधारे विभागाने सांगितले.

# जितेश (बंटी सर) उगलमुगले सरांचे सलग दुसऱ्यावर्षी बीड जिल्ह्यावर वर्चस्व

## बंटी सरांचा विद्यार्थी शिवम भांडेकर आठवी नवोदय पेपर मध्ये बीड जिल्ह्यातून प्रथम क्रमांक मिळवून उत्तीर्ण

शिरुरकासार(प्रशांत बाफना)

फक्त २ वर्ष झाले बंटी उगलमुगले सरांचे शिक्षण क्षेत्रात आगमन होऊन, मागच्या वर्षी प्रीती अभिमान उगले आठवी नवोदय परीक्षेमध्ये बीड जिल्ह्यातून प्रथम होती, आठवी स्कॉलरशिप मध्ये पाथर्डी तालुक्यातून प्रथम तसेच अहमदनगर जिल्ह्यातून टॉप १० मध्ये होती. आणि ह्या वर्षी सुध्धा शिवम भांडेकर आठवी नवोदय परीक्षेमध्ये बीड जिल्ह्यातून प्रथम क्रमांक आला आहे.

स्वतः बंटी सरांचे पूर्ण शिक्षण शिरूर कासार मधील कालिका देवी महाविद्यालयला झाल्यामुळे, ह्या भागातील विद्यार्थी कुठ चूक जास्त करतात आणि कोणत्या पद्धतीने विद्यार्थींना शिकवायला पाहिजे हे चांगल्या पद्धतीने लक्षात आले आहे अस बंटी सरांनी सांगितले. शिरूर तालुक्याच्या इतिहासात असे कधीच झाले नाही की, सलग २ वर्ष बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील विद्यार्थी पेक्षा भारी राहून शिरूर कासार तालुक्यातील विद्यार्थी टॉप एक मध्ये येतात.जितेश (बंटी सर) उगलमुगले ह्यांचा शिरूर तालुक्यात शैक्षणिक वातावरण तयार करण्याचा जोरदार प्रयत्न सुरू असल्याचे दिसत आहे.कोण बनेगा करोडपती ह्या गेमला प्रेरित होऊन अगदी तसाच हुबेहूब कोण बनेगा टॉपर नावाची संकल्पना काढून शैक्षणिक खेळ घेतला जातो. जवळपास १०० विद्यार्थी मध्ये वेगवेगळ्या टीम बनवून त्यांना एमपीएससी, यूपीएससी सारख्या परीक्षांचे अभ्यासक्रम काढून देण्यात येतो,



त्यामध्ये भारतीय राज्यघटना, भारताचा भूगोल, विज्ञान, इतिहास, मराठी ग्रामर, इंग्लिश ग्रामर, महाराष्ट्राचा नकाशा, समाज सुधारक , सारख्या विषयाच्या अभ्यासक्रम देण्यात येतो. इतक्या छोट्या वयात इतक्या हसत खेळत अभ्यासक्रम चालत राहिला तर भविष्यात नक्कीच शिरूर कासार तालुक्यातून मोठ मोठे अधिकारी तयार होतील असे बंटी सर म्हणतात. जिंकलेल्या टीमला पाच हजार रुपये बक्षीस देऊन त्यांचा सन्मान केला जातो.

२०२३ च्या स्कॉलरशिप आणि एनएमएमएस् परीक्षेमध्ये सुध्धा चांगलेच यश मिळाले आहे. क्लासेस मध्ये ए.सी लावून शिरूर तालुक्यातील पहिला ए.सी क्लास बनवण्याचा मान सुध्धा मिळवला आहे. काही महिन्यांपूर्वी झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निम्मित जिल्हा परिषद बीड मार्फत घेण्यात आलेल्या सामान्यज्ञान स्पर्धा मध्ये बंटी सरांनी विद्यार्थ्यांची तयारी अगदी मनापासून घेतली होती. त्या परीक्षेमध्ये पूर्ण बीड जिल्ह्यातून टॉप ७ विद्यार्थी मध्ये बंटी सरांच्या ५ विद्यार्थ्यांचा समावेश होता. त्यामधे शिवानी दत्ता गाडेकर, प्रीती अभिमान उगले, पृथ्वी बाळू उगले, राम बाप्पाजी नागरगोजे, भारती उध्दव जायभाये होते. पूर्ण बीड जिल्ह्यातून शिरूर कासार चे ५ विद्यार्थी टॉप येणे हे शिरूर कासार तालुक्यासाठी नक्कीच खूप अभिमानास्पद होते.भविष्यामध्ये अश्याच पद्धतीचे निकाल बंटी सरांच्या मार्गदर्शनाने लागावेत अशी सर्वांना अपेक्षा आहे. भविष्यामध्ये शिरूर कासार तालुक्यातील विद्यार्थ्यांचे जोपर्यंत महाराष्ट्राच्या टॉपर लिस्ट मध्ये नाव येत नाही तोपर्यंत शांत बसणार नाही. असे बंटी सरांनी सांगितले



# कुटे ग्रूपने शिरूर तालुक्यातील निराधारांची दिवाळी केली गोड

## एक्कावन कुटुंबीयांना फराळ साहित्याचे केले वाटप

शिरूरकासार ।प्रतिनिधी

सालाबाद प्रमाणे याही वर्षी कुटे ग्रूपच्या वतीने तालुक्यातील निराधारांची दिवाळी गोड करण्यात आली असून निराधार कुटुंबाच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचे काम केले आहे.उद्योग जगतात संपूर्ण जिल्हयात नावाजलेला कुटे ग्रूप सामाजिक कार्यात देखिल अग्रेसर असुन वंचित,दुखित आणि निराधार कुटुंबाच्या आनंदात सक्रियपणे सहभागी असतो.हिंदू संस्कृती मध्ये असलेल्या साडेतीन शुभ मुहूर्तांपैकी एक पूर्ण शुभ मुहूर्त असलेल्या दसरा सणाच्या दिवशी देखील सुरेश कुटे यांनी ज्येष्ठ नागरिकांचा सांभाळ करणाऱ्या आजोळ प्रकल्पातील नागरीकांना कपडे घेतले होते.त्यानंतर पंधरा दिवसांत आलेल्या दिवाळी सणाला फराळाचे वाटप करून गोरगरीब कुटुंबाचा आनंद द्विगुणित करण्याचे काम केले आहे.शहरातील बालाजीनगर मंदिर परिसरात फराळ किटचे वाटप प्रथम उपनगराध्यक्ष प्रकाश देसारडा यांच्यासह पत्रकार गोकुळ पवार,उज्वल बोरा,माऊली गाडेकर,अमोल बर्वे,धनंजय झिंजुर्डे यांनी केले.




# लिंबागणेश मध्ये वाढत आहे कचऱ्याचे साम्राज्य...!

लिंबागणेश ।हरिओम क्षिरसागर

बीड तालुक्यात असणारे लिंबागणेश गाव आजकाल तीर्थक्षेत्र म्हणून खूप प्रसिद्ध होत आहे. मात्र लिंबगणेश मधील जनतेने गावात सर्व सुख सोयी, सुविधा तसेच नवीन काहीतरी रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. या आशेने ग्रामपंचायतला निवडून दिले मात्र ग्रामपंचायत मधील पदाधिकारी कुठलेच यंत्रणा गावात राबवायला तयार नाही त्यांना वारंवार सांगूनही काही फरक पडत नसल्याकारणाने आता तर हद्द झाली ग्रामपंचायत समोरच कचऱ्याचा डेपो झाला आहे सदरील दृश्य हे ग्रामपंचायत समोरील असून ग्रामपंचायत आता तरी काही दखल घेणार आहे का की नाही ? याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागलेले आहे .

# पश्चिम महाराष्ट्रातून जायकवाडी धरणात पाणी न सोडल्यास मराठवाड्यातील शेतकऱ्यांना घेऊन आमरण उपोषण करणार -अशोक हिंगे पाटील

## आष्टी ता. परतुर येथे वंचित बहुजन आघाडीचा भव्य कार्यकर्ता मेळावा संपन्न

आष्टी ।प्रतिनिधी

तालुका परतुर जिल्हा जालना या ठिकाणी अशोक हिंगे पाटील यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली कार्यकर्ता मेळावा घेण्यात आला, सर्वप्रथम आष्टी शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करून रॅली काढण्यात आली या रॅलीचा समारोप डॉ बाबासाहेब आंबेडकर सभागृह क्रांती भूमी या ठिकाणी करण्यात आला व याच क्रांती भुमित मेळाव्याला सुरुवात झाली. या मेळाव्याला प्रमुख उपस्थिती व प्रमुख मार्गदर्शक म्हणून वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे पाटील हे उपस्थित होते, यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये जिल्हा प्रभारी जितेंद्र सिरसाठ, विभागीय उपाध्यक्ष दीपक डोके, मुख्य संघटक महेश निनाळे, जालना जिल्हा कार्याध्यक्ष परमेश्वर खरात, परतुर तालुका अध्यक्ष रवींद्र भदर्गे कार्यक्रमाचे आयोजक प्रकाश मस्के,यावेळी प्रसंगी बोलताना अशोक हिंगे म्हणाले की सर्वसामान्यांच्या प्रश्नासाठी वंचित बहुजन आघाडी सातत्याने रस्त्यावर उतरून संघर्ष करत आहे. यावर्षी मराठवाड्यात अत्यल्प पाऊस झाल्याने दुष्काळग्रस्त परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे दिनांक १६ सप्टेंबर रोजी औरंगाबाद येथील मंत्रिमंडळाच्या बैठकीवर धडक मोर्चा काढला होता. त्याची नोंद घेऊन शासनाला दुष्काळ जाहीर करून अग्रमी पिक विमा देण्यास भाग पाडले. एक ऑक्टोबर रोजी पश्चिम महाराष्ट्रा च्या धरणातून जायकवाडी धरणात पाणी समप्रमाणात म्हणजेच (साडे आठ



टीएमसी) पाणी सोडावे या मागणीसाठी गोदावरी महामंडळाच्या कार्यासमोर धरणे आंदोलन केले होते. लेखी आश्वासन देऊनही अद्यापही पाणी सोडण्यास संपदा मंत्री देवेंद्र फडणवीस तयार नाही. हक्काचे पाणी मराठवाड्याला मिळावे यासाठी लवकरच शेतकऱ्यांना घेऊन आमरण उपोषण बसणार असल्याची माहिती अशोक हिंगे यांनी दिली. यावेळी कार्यकर्त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडून साठी कार्यकर्त्यांनी संघटनात्मक बांधणी करून संघटन वाढवावे जिल्हा प्रभारी जितेंद्र शिरसाट, दीपक डोके, महेश निनाळे यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

यावेळी बीडचे जिल्हा पदाधिकारी, धम्मानंद साळवे, भारत तांगडे, अंकुश जाधव, सचिन उजगरे, जिल्हा उपाध्यक्ष बाबुराव गोसावी जिल्हा महासचिव किशोर त्रिभुवन, चखाजी सुंदरे परतुर शहराध्यक्ष राहुल नाटकर मंठा तालुका अध्यक्ष सुभाष जाधव, कार्यक्रमाचे आयोजक सूत्रसंचालन शाहूजी आव्हाड यांनी आभार प्रदर्शन केले. मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.आष्टी येथील मेळाव्या प्रसंगी भाजपच्या असंख्य कार्यकर्त्यांनी वंचित बहुजन आघाडी मध्ये अशोक हिंगे यांच्या उपस्थितीमध्ये प्रवेश केला

# स्नेहमिलन व पानसुपारीच्या कार्यक्रमास उपस्थित रहा-आ.संदीप क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी

मंगळवार दि.१४ नोव्हेंबर रोजी आयोजित केलेल्या स्नेहमिलन व पानसुपारीच्या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते तथा कर्जत-जामखेड विधानसभा मतदार संघाचे आ.रोहित दादा पवार हे सह कुटुंब उपस्थित असणार आहेत.

कार्यकर्त्यांसोबत यावेळची दिवाळी साजरी करण्याचा निर्णय राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते आ.रोहित पवार व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष आ.संदीप क्षीरसागर यांनी घेतला असून उद्या दि.१४ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ११ वा. बीड येथील राष्ट्रवादी भवन याठिकाणी स्नेहमिलन



### आ.रोहित पवार यांच्यासह कुटुंब उपस्थित राहणार

व पानसुपारीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमास आ.रोहित पवार व आ.संदीप क्षीरसागर हे आपल्या कुटुंबासमवेत उपस्थित असणार आहेत. तरी, या कार्यक्रमास सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी व मित्र परिवार यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून करण्यात आले आहे.

# सर्वसामान्यांना केंद्र सरकारची मोठी भेट!

प्रधानमंत्री उज्वला योजनेच्या लाभार्थ्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. पंतप्रधान उज्वला योजना अंतर्गत केंद्र सरकार लाभार्थ्यांना आणखी दिलासा देण्याच्या तयारीत आहे. येत्या काही दिवसांत तुम्हाला आता एलपीजी गॅस सिलेंडरवर आणखी सूट मिळू शकते. पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीपूर्वी केंद्र सरकार उज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना दिलासा देण्याच्या तयारीत आहे. सध्या पंतप्रधान उज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना वर्षभरात १२ एलपीजी गॅस सिलेंडरवर ३०० रुपये सबसिडी मिळते. येत्या काही महिन्यांत उज्वला योजनेंतर्गत अतिरिक्त सवलती देण्याबाबत निर्णय घेतला जाऊ शकतो.



### सर्वसामान्यांना महागाईतून दिलासा मिळणार

मीडिया रिपोर्टनुसार, केंद्र सरकार सर्वसामान्यांना महागाईपासून दिलासा देण्याचा प्रयत्न करत असल्याचं सांगितलं जात आहे. लाइव्हमिंटच्या वृत्तानुसार, या वृत्ताबाबत पेट्रोलियम मंत्रालय आणि वित्त मंत्रालयाकडून ईमेलद्वारे माहिती मागवण्यात असता, त्यांच्याकडून कोणतीही अधिकृत माहिती मिळालेली नाही. भू-राजकीय तणावामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पेट्रोलियम पदार्थांच्या किमती वाढलेल्या असताना केंद्र सरकार सर्वसामान्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न करत असल्याचं दिसत आहे.केंद्रीय मंत्रिमंडळाने ४ ऑक्टोबर रोजी ९.५ कोटी प्रधानमंत्री उज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना १०० रुपये अनुदान मंजूर केले होते. याआधी सप्टेंबरमध्ये सरकारने देशभरातील सर्व सामान्य ग्राहकांसाठी एलपीजी गॅस सिलेंडरवर २०० रुपये सबसिडी मंजूर केली होती. सध्या उज्वला योजनेचे लाभार्थी एका एलपीजी गॅस सिलेंडरसाठी ६०३ रुपये मोजतात, तर इतर सरासरी ग्राहकांना एका एलपीजी गॅस सिलेंडर ९०३ रुपये द्यावे लागतात.

# केज तालुक्यातील बनसारोळा गावचा विकासाचा विडा उचलण्यात अजित गोरे भारी

**केज/प्रतिनिधी**

**बनसारोळा गावची परंपरा कायम न टिकवता तीस चाळीस वर्षांपासूनच्या नेतृत्वांना नाकारण्याच काम बनसारोळा गावच्या नागरिकांनी केले आहे. अजित गोरे यांच्यावर गाव कारभारी पदाची जबाबदारी देण्याचे काम गावकऱ्यांनी दिले आहे. कै.काशीनाथ बापु गोरे यांच्या चौथ्या पिढीच्या घरातील युवक अजित गोरे यांना बनसारोळा गावची सेवा करण्याची संधी देण्याचे काम बनसारोळा गावातील नागरिकांनी व युवकांनी तसेच महिलांनी दिले आहे.**



अजित गोरे हे अमेरिका येथे कामाला होते.बनसारोळागावासाठी त्यांनी तेथील काम सोडून बनसारोळा गावची सेवा करण्याचा विडा उचलला आहे.अजित गोरे यांनी चार वर्षांपासूनबनसारोळा गावातील सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवुन देण्यासाठी काम केले आहे.आणी आता ते बनसारोळा गावच्या सरपंच पदावर विराजमान झाले आहेत.अजित गोरे यांनी आतापर्यंत कुठल्याही राजकीय पक्षात प्रवेश केलेला नाही.याच कारणाने बनसारोळा गावच्या नागरिकांनी त्यांच्यावर विश्वास ठेवला आहे. बनसारोळा गावात वेगवेगळ्या राजकीय पक्षाचे नेटवर्क फार मोठे आहे. परंतु त्या राजकीय पक्षांच्या पदाधिकारी यांना डावलुन अजित गोरे यांना सरपंच पदावर नागरिकांनी बसवले आहे. नागरिकांना बनसारोळा गावच्या सर्वांगीणविकासा साठी बदल करण्यासाठी प्रयत्न करत होते.परंतु ते शक्य झाले नव्हते पण आता ते अजित गोरे यांच्या मुळे शक्य झाले आहे.

# जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेच्या जेष्ठ मार्गदर्शक पदी डॉ.दीपाताई क्षीरसागर यांची निवड

## राज्यस्तरीय बैठकीत नवनियुक्त प्रदेश, विभागीय कार्यकारणी पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर

छ.संभाजीनगर ।प्रतिनिधी

मराठा सेवा संघ प्रणित जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषद, महाराष्ट्र राज्य कक्षाच्या जेष्ठ मार्गदर्शक पदी डॉ.दीपाताई क्षीरसागर यांची पुढील तीन वर्षाच्या कालावधीसाठी नियुक्ती करण्यात आली आहे. छत्रपती संभाजी नगर येथील जिजाऊ मंदिर, राजर्षी शाहू भवन, म्हाडा कॉलनी येथे दि.०९ नोव्हेंबर रोजी मराठा सेवा संघ प्रणित जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषद, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राज्यस्तरीय बैठक आणि नवनियुक्त प्रदेश कार्यकारणी व विभागीय कार्यकारणी पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीपत्र प्रदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून छ.संभाजी नगर चे जेष्ठ साहित्यिक डॉ.विजय पाथ्रीकर, बीड च्या जेष्ठ साहित्यिक डॉ.दीपाताई क्षीरसागर, छ.संभाजी नगर चे पोलीस उपनिरीक्षक शिवश्री. मधुकर मोरे यांची उपस्थिती होती. जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेचे प्रदेशअध्यक्ष डॉ.सुभाष बागल, प्रदेश कार्याध्यक्ष डॉ.सतीश तराळ हे अध्यक्षस्थानी तर प्रदेश संपर्कप्रमुख डॉ. श्यामसुंदर महाराज सोन्नर, प्रदेश महिला संघटक प्राचार्य डॉ.शरयू तायवाडे, प्रदेश महिला संपर्कप्रमुख डॉ.तेजस्विनी डांगे, मराठा सेवा संघाचे प्रदेश उपाध्यक्ष शिवश्री. संदिपान जाधव, विभागीय




अध्यक्ष शिवश्री. धनंजय पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ.दीपाताई क्षीरसागर यांची जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषदेच्या जेष्ठ मार्गदर्शक पदी नियुक्ती करण्यात आली. मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष शिवश्री. इंजि.विजयजी घोगरे, मराठा सेवा संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक यांच्या शुभहस्ते डॉ. दीपाताई क्षीरसागर यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

याप्रसंगी बोलताना डॉ.दीपाताई क्षीरसागर म्हणाल्या की, वारकरी संप्रदायातील संत तुकाराम हे थोर संत होते. त्यांचे महात्म्य आणि त्यांची भक्ती दोन्हीही अजरामर झाले. संत तुकोबा पुरोगामी विचाराचे होते. त्यांचे विचार हे सामाजिक आणि वैयक्तिक उन्नती घडवून आणणारे होते. त्यांनी त्याकाळात आपल्या अभंगातून अंधश्रद्धा निर्मूलनाचे विचार मांडले. समाजमनावरील अंधश्रद्धेचा पगडा दूर करून लोकांना नवा धर्म, नवी भाषा देण्याचं काम संत तुकारामांनी केले. त्याकाळात संत तुकारामांनी आपल्या साहित्यातून व कीर्तनातून समाजाला अचूक मार्गदर्शन करण्याचे कार्य केले. संत तुकोबारायांनी विष्णुमय जग वैष्णवांचे धर्म भेदाभेदभ्रम अमंगळ या अभंगातून हे जग विष्णुमय आहे, वैष्णव हा एकच धर्म सर्वत्र आहे. माणसा-माणसांमध्ये भेद करने ही अमंगल बाब आहे. भक्तांनी भगवंताचे श्रवण, चिंतन करून आपले हित साधुन घ्यावे. आपल्या हातून कोण्याही जीवांचा मत्सर घडू नये, हीच खरी ईश्वर भक्ति असल्याचे सांगितले. तुकोबा म्हणतात, जे परिस्थितीने व सांसारिक तापाने रंजले गांजलेले लोक आहेत, त्यांना जो आपले म्हणतो. तोच खरा साधू असल्याचे समजावे. समाजातील व्यर्थ गोष्टी, प्रथा आणि परंपरा यांवर त्यांनी परखड भाषेत टीका केली. ईश्वर भक्तीसाठी भक्तीचा सुगम मार्ग त्यांनी दाखवला. तुकाराम महाराज हे आपल्या कीर्तनातून जनजागृती करत असत. त्यांचे अभंग आणि कीर्तने ही सर्व साक्षात्कारी अनुभवातून अवतरलेली होती. तुकोबाराय यांनी अंधश्रद्धा तर दूर केलीच परंतु अध्यात्म बरोबर सामाजिक एकतेचा संदेश दिला असे डॉ.दीपाताई क्षीरसागर यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले. तसेच यावेळी त्यांनी जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेच्या जेष्ठ मार्गदर्शक पदी नियुक्ती केल्याबद्दल आभार मानले व जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेच्या कार्यामध्ये सक्रिय सहभागी होऊन या कक्षाच्या विचार - कार्याचा प्रसार व प्रचार शेवटच्या घटकांपर्यंत घेऊन जाणार असल्याचे सांगितले.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT